**<u>ठळक बातम्या</u>**

- न्यायाधीशांच्या घरातून रोकड जप्त केल्याच्या मुद्द्यावरून राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी बोलावली सभागृह नेत्यांची बैठक

- महाराष्ट्र विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं अंतिम आठवडा चर्चेला उत्तर

- छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या फरार प्रशांत कोरटकर याला तेलंगणातून अटक

- छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात आज झालेल्या चकमकीत ३ नक्षलवादी ठार

**आणि**

- मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत युकी भांब्री आणि नुनो बोर्जेस यांच्या जोडीचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या घरातून रोकड जप्त केल्याच्या मुद्द्यावरुन राज्यसभा अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज संध्याकाळी सभागृह नेत्यांची बैठक बोलावली आहे. हा गंभीर विषय असून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढला जाईल असं जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक विषयावर संयुक्त संसदीय समितीची बैठक आज संसद भवनात होणार आहे. यावेळी समिती डीडीसैटचे अध्यक्ष आणि दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती डी.एन.पटेल यांच्याशी चर्चा करणार आहे.

त्यानंतर समितीची बैठक अटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांच्याबरोबरही चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

दिल्लीचा २०२५-२६ वर्षाचा एक लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री रेखा गुप्ता यांनी आज विधानसभेत सादर केला. भाजपाची सत्ता असलेल्या दिल्ली सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प प्रत्येक क्षेत्राच्या विकासावर आणि प्रगतीवर लक्ष केंद्रित करणारा असल्याचं अर्थमंत्री रेखा गुप्ता यांनी सभागृहात अर्थसंकल्प सादर करताना म्हटलं. अर्थसंकल्पात २८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त भांडवली खर्चाची तरतूद करण्यात आली आहे जी मागील अर्थसंकल्पापेक्षा जवळजवळ दुप्पट असल्याचं अर्थमंत्र्यांनी म्हटलं आहे. दिल्ली सरकारच्या महिला समृद्धी योजनेसाठीही अर्थसंकल्पात ५ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दिल्लीत शंभर वेगवेगळ्या ठिकाणी अटल कॅन्टीन स्थापन करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात शंभर कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणाही त्यांनी केली. दिल्ली विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन या महिन्याच्या २८ तारखेपर्यंत सुरू राहील.

**<><><><><>**

विधासभेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर दिलं.

छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांविरोधात अपशब्द वापरणाऱ्या कोरटकर याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

राज्यात हुक्का पार्लरचं वाढतं प्रस्थ रोखण्यासाठी यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा मुख्यमंत्री त्यांनी केली. हा गुन्हा दखलपात्र केला जाणार असल्याचं ते म्हणाले. याशिवाय दुसऱ्यांदा हुक्का पार्लर सापडलं तर संबंधित उपहारगृहाचा परवाना आधी सहा महिन्यांसाठी निलंबित केला जाईल तर

तिसऱ्यांदा हुक्का पार्लर सापडलं तर परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल असं त्यांनी सांगितलं.

सहकारी उपनिबंधक कार्यालयातला भ्रष्टाचार रोखण्यासाठी सर्व कामकाज डिजिटल केलं जाणार आहे, त्यासंबंधी आधी तीन आणि नंतर सहा महिन्यात संबंधीत कार्यवाही पूर्ण केली जाणार असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

राज्यातील शहरांमधल्या नद्यांच्या पूर पातळीसंदर्भातल्या निळ्या आणि लाल रेषांचं समिती स्थापन करून तातडीनं पुन्हा सर्वेक्षण करण्याचं आश्वासन प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज एका लक्षवेधीच्या उत्तरात विधानसभेत दिलं. या रेषेत येणाऱ्या जमिनीवर अवैधरित्या विकासकामांची परवानगी दिली असेल तर ती रद्द करून संबंधित व्यक्तीवर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात कोविड काळात झालेल्या भ्रष्टाचारप्रकरणी संबंधित तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकांना निलंबित करून त्यांची तीन महिन्यात चौकशी करू, इतर दोषींवरही कारवाई करू अशी घोषणा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली.

मुंबईच्या किनारा नियंत्रण तसंच ना विकास विभागात बेकादेशीरपणे केलेल्या २६७ बांधकामांविरोधात महापालिकेच्या वतीनं तातडीनं कारवाई करून ती पाडली जातील, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या प्रकरणात नकाशांमध्ये बेकायदेशीरपणे केलेल्या फेरफार आणि चूकीच्या परवानग्यांबद्दल विशेष चौकशी समिती स्थापन केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

सिंहगड किल्ल्याच्या विकासासाठी संबंधित सर्व यंत्रणा आणि विभागांचा एकत्रित प्रस्ताव १५ दिवसात पाठवणार असून, स्थानिक पातळीवरील सर्व यंत्रणांचा एकत्रित विकास आराखडा तीन महिन्यात तयार करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात दिली.

<><><><><>

विधान परिषदेतही आज अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय गंभीर आहे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारीला चालना मिळत आहे, असा आरोप आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या चर्चेला सुरुवात करताना केला. सरकारची कारवाईची मानसिकता नसल्यानं गुन्हेगारांना अभय मिळू लागलं आहे आणि त्यामुळे गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे, सरकारला केवळ बुलडोझरनं निरपराध लोकांची घरं पाडण्यात स्वारस्य आहे, असा आरोपही त्यांनी केला.

कोकणात रायगडमधल्या रेवसपासून सिंधुदुर्गातल्या रेडी पर्यंतच्या ५२३ किलोमीटरच्या सागरी महामार्गाचं नूतनीकरण करून हा मार्ग चौपदरी ग्रीनफिल्ड मार्ग करणार असल्याचं, मंत्री दादा भुसे यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. हे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या प्रशांत कोरटकरला कोल्हापूर पोलिसांनी तेलंगणातून अटक केली आहे. कोरटकर याने २४ फेब्रुवारी रोजी इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोनद्वारे धमकी दिली होती. त्या दिवसापासून कोरटकर हा फरार होता. कोरटकरला आज कोल्हापूर न्यायालयात हजर करण्यात आलं असून पोलिसांनी सात दिवसांची कोठडी देण्याची विनंती केली आहे.

<><><><><>

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबन गीत सादर करणारा हास्य कलाकार कुणाल कामरा यानं माफी मागायला नकार दिला आहे. आपल्या कार्यक्रम स्थळाची शिंदे यांच्या समर्थकांकडून केलेल्या तोडफोडीचाही त्याने निषेध केला.

कुणाल कामरानं एका लोकप्रिय हिंदी गाण्याच्या चालीवर एकनाथ शिंदे आणि शिवसेना फुटीच्या संदर्भात टिप्पणी केली होती. हे गाणे व्हायरल झाल्यानंतर शिंदे यांच्या समर्थकांनी त्याच्या स्टुडिओत तोडफोड केली होती. त्याने केलेल्या टिप्पणीवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून नंतर तो खार पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

<><><><>

छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत ३ नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा दलानं बीजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यातल्या जंगलात ही कारवाई केली. यावेळी त्यांची नक्षलवाद्यांबरोबर चकमक झाली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रं आणि दारुगोळा जप्त करण्यात आला असून अधिक तपास सुरु आहे.

<><><><>

जम्मू काश्मिरमध्ये कठुआ जिल्ह्यात मध्ये दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरु असलेल्या शोधमोहिमेत कार्बाइनच्या अनेक मॅगझिन आणि बुलेटप्रूफ जॅकेट सापडलं आहे. सान्याल गावात एका नर्सरीमध्ये दहशतवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी विशेष मोहिमेदरम्यान लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी पोलिस पथकावर गोळीबार सुरू केला. या गोळीबारात कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही. या मोहिमेत काही एम-४ कार्बाइन मॅगझिन, स्लीपिंग बॅग्ज, ट्रॅकसूट, अन्नसाठा आणि पॉलिथिन बॅग्ज सापडल्या असल्याची, माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><>

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत, भारताच्या युकी भांब्री आणि पोर्तुगालच्या नुनो बोर्जेस यांच्या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी चेकियाच्या ॲडम पावलासेक आणि युनायटेड किंग्डमच्या जेमी मरे या जोडीचा ७-

६, ६-२ असा पराभव केला. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना उद्या युनायटेड किंग्डमच्या लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश यांच्याशी होईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्स यांच्यात सामना होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

काल झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं लखनौ सुपर जायंट्सचा एक गडी राखून पराभव केला. लखनौनं दिलेल्या २१० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीनं १९ षटकं आणि तीन चेंडूत ९ गडी गमावून २११ धावा करत हा सामना जिंकला.

**//<><><><><>//**